साप्ताहिक
■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024
स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ५२ ● मंगळवार, दि. १३ ते २० मे २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

# वाशिम येथे आपदा मित्र प्रशिक्षणास उत्साहात सुरुवात

**वाशिम,दि.११ मे (जिमाका) जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाची क्षमता वाढविण्यासाठी आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमाला प्रारंभ झाला. मुंबई येथील आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम आणि आयटस संस्था सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ते १९ मे २०२५ या कालावधीत हे प्रशिक्षण महिला व बालविकास भवन येथे घेतले जात आहे.**






कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी वाशिमचे तहसीलदार निलेश पळसकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, सामाजिक कार्यकर्ते गजानन मेसरे, आयटस संस्थेचे श्री.फय्याज व अन्य प्रशिक्षक उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात वाशिम, रिसोड आणि मालेगाव येथील प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. हे प्रशिक्षणार्थी 'आपदा मित्र' व 'आपदा सखी' म्हणून पुढील काळात कार्य करणार आहेत. आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित करताना अपर जिल्हाधिकारी घुगे म्हणाले, आपत्ती कधीही, कुठेही येऊ शकते. अशा प्रसंगी आपण सज्ज असलो तर आपत्तीचे संकट संधीमध्ये रूपांतरित होऊ शकते.

तहसीलदार पळसकर यांनी आपत्ती व्यवस्थापन मित्र संकल्पनेची माहिती देताना सांगितले, आपण केवळ स्वयंसेवक नसून, समाजाचे खरे रक्षक आहोत.



आपत्तीच्या वेळी सजग आणि तत्पर नागरिक म्हणून भूमिका बजावणे हीच खरी सेवा आहे. या प्रशिक्षणामध्ये प्राथमिक उपचार, अग्निशमन तंत्र, सुरक्षित बचाव उपाय, जलद प्रतिसाद प्रणाली , टीमवर्क व समन्वय अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार असल्याचे शाहू भगत यांनी सांगितले. कार्यक्रमाला प्रशिक्षक अनिकेत जाधव, रुचिका शिर्के, सौरभ कांबळे, यश पवार, वाशिम येथील प्रशिक्षक अनिल वाघ, तसेच नेहरू युवा केंद्राचे प्रतिनिधी प्रदीप पट्टेबहादूर यांची उपस्थिती होती.

प्रशिक्षणात आशा व अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी केले. आभार प्रदर्शन प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले.

# मरणोत्तर नेत्रदानातून अंधांच्या जीवनात प्रकाश

## ■ स्व. विनय नानासाहेब पाटील यांचे प्रेरणादायी योगदान

वाशिम (जिमाका) : वाशिम शहरातील देवपेठ येथील रहिवासी विनय नानासाहेब पाटील (वय ५८) यांचे दि. ६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता दुःखद निधन झाले. समाजशील व कुटुंबवत्सल असलेल्या पाटील कुटुंबासाठी हे अपूरणीय नुकसान असले, तरी त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी अत्यंत प्रेरणादायी निर्णय घेतला.

विनय पाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी नेत्रदानाचा निर्णय घेतला. त्यांच्या दोन्ही नेत्रांचे संकलन जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील नेत्रतज्ज्ञांच्या पथकाने केले. यामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. संकलित नेत्रे तत्काळ अकोला वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आली.



या पुण्यकार्यामध्ये अभिजित पाटील यांनी पुढाकार घेतला, तर श्रीमती गंगाबाई नानासाहेब पाटील व राम पाटील यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. नेत्रदान चळवळीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी अशा कुटुंबांचा आदर्श इतरांनी घ्यावा, असे आवाहन अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाचे कार्यकारी समिती अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वैभव वाघमारे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले. तसेच, पाटील कुटुंबीयांचे विशेष आभारही त्यांनी मानले.

एक निर्णय : दोन डोळे : अंधांच्या जीवनात नवा प्रकाश !

नेत्रदानासारख्या महान कार्यातून माणूस मृत्यूनंतरही अजरामर होऊ शकतो, हे स्व. विनय नानासाहेब पाटील यांच्या उदाहरणातून स्पष्ट होते.

# जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिन व समन्वय समितीची महत्त्वपूर्ण सभा



वाशिम -लोकशाही दिन व समन्वय समितीची महत्त्वपूर्ण सभा जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या अध्यक्षतेखाली वाशिम येथे पार पडली.

या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी विश्वनाथ गुगे, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे विकास शुभम जोशी, ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता वानखडे, वाशिम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निलेश गायकवाड आदी अधिकारी उपस्थित होते. सभेत जिल्ह्यातील विविध शासकीय योजना, स्थानिक समस्या आणि त्यावरील उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली.

# बार्टी संस्थेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात ४६ टक्के वाढ

### सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

मुंबई, दि. १० : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) संस्थेत मागील १२ वर्षांपासून मानधनावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यानुसार ४६ टक्के वाढ करण्यात आली आहे. हे कर्मचारी अनेक वर्षापासून मानधनावर काम करत आहे. यावाढीमुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. मंत्री शिरसाट म्हणाले, वाढत्या महागाईमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी लक्षात घेता ही वाढ अत्यंत आवश्यक होती. या निर्णयामुळे जात पडताळणी कार्यालये, बार्टी मुख्यालय, उपकेंद्रे तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढ या मागणीवर समाधानकारक तोडगा निघाला आहे. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी घेतलेला हा निर्णय म्हणजे सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी असल्याची भावना सर्व कर्मचाऱ्यांनी व्यक्त करुन सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांचे आभार मानले आहेत.

# महिला सक्षमीकरणाची नवी मुद्रा

मुद्रा योजनेमुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मिळणार्या (एमएसएमई) कर्जात वाढ झाली आहे. भारताच्या अर्थकारणात महिलांचा वाढता सहभाग सकारात्मक चित्र निर्माण करणारा आहे. 'प्रधानमंत्री मुद्रा' योजना सुरू करण्याचा उद्देश प्रामुख्याने मायक्रोफायनान्स क्षेत्राला बळकटी देत नियमित कर्जापासून वंचित असलेल्या लोकांना सहजपणे पैसे उपलब्ध करून देण्याचा होता. या योजनेने गेल्या दहा वर्षांत भारताच्या अर्थव्यवस्थेला केवळ बळच दिले नाही, तर महिला सक्षमीकरणाचा एक टप्पाही पार केला आहे. देशाची निम्मी लोकसंख्या असलेल्या महिलांचा सहभाग जोपर्यंत वाढत नाही, तापर्यंत कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था बळकट होत नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. मागील काही दशकांत देशात सरकारचे खंबीर धोरण आणि सर्वंकष योजनांचा आराखडा तयार केल्याने भारतीय अर्थव्यवस्थेचा गाभा असलेल्या कुटीर आणि लघु उद्योगांनाच केवळ संजीवनी मिळाली नाही, तर देशातील निम्मी लोकसंख्या देखील आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याकडे वाटचाल करू लागली आहे.एमएसएमई क्षेत्र हे देशाचे अर्थचक्र गतीमान करते त्याचबरोबर महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासही हातभार लावते. प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधानमंत्री मुद्रा, स्टार्टअप इंडिया आणि स्टँडअप इंडिया या योजना आपल्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम करत आहेत आणि म्हणूनच एमएसएमई क्षेत्र आता भारताच्या आर्थिक विकासाचा पाया ठरत आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय आर्थिक उत्पन्नात एमएसएमईचा वाटा २०२१-२२ मधील २८.६ टक्क्यांनी वाढून तो २०२२-२३ मध्ये ३०.०१ टक्के झाला आहे. याप्रमाणे एमएसएमईची अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका लक्षात येते. एमएसएमईच्या माध्यमातून निर्यातीला देखील चालना मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील ३.९५ लाख कोटी रुपये मूल्य असलेली निर्यात २०२४-२५ मध्ये १२.३९ लाख कोटी रुपयांवर पोचली आहे. 'एमएसएमई'साठी मुद्रा योजना ही एकप्रकारे लाइफलाइन म्हणून समोर आली आहे. गेल्यावर्षीच्या अहवालानुसार आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने देखील 'पीएमएमवाय'सारख्या योजनेच्या माध्यमातून देशातील उद्योजकता विकास कार्यक्रम सकारात्मक असून या माध्यमातून स्वयंरोजगाराला एकप्रकारे बुस्ट मिळत असल्याचे म्हटले होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या क्षेत्रात महिलांची वाढती संख्या. यातही त्यांचा सहभाग वाढण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे कर्जाची उपलब्धता. 'एसबीआय'च्या अहवालानुसार बँकेच्या एकूण कर्जात 'एमएसएमई'चा वाटा आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये १५.८ टक्के होता आणि तो आता वाढत २०२३-२४ मध्ये सुमारे २० टक्के झाला आहे. या व्याप्तीने लहान शहर आणि ग्रामीण भागातील व्यावसायिकांना आर्थिक साह्य मिळणे सुलभ झाले आहे. एकप्रकारे भारताची अर्थव्यवस्था सशक्त होत असल्याचे दिसून येते. मुद्रा योजनेच्या एकूण लाभार्थ्यांत ६८ टक्के महिला असून महिलांच्या नेतृत्वाखाली असलेल्या उद्योगांना चालना देण्यासाठी पीएमएमवाय योजना उपयुक्त ठरत असल्याचे सिद्ध झाले आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून ते २०२४-२५ या काळापर्यंत पीएमएवाय योजनेनुसार प्रत्येक महिलेला दिला जाणार्या निधीत वार्षिक १३ टक्क्यांनी वाढ होत तो निधी आता दर महिला ६२,६७९ रुपयांवर पोचला आहे. त्याचवेळी प्रती महिला वाढीव ठेव रक्कम ही वार्षिक चौदा टक्क्यांनी वाढत ती ९५,२६९ रुपयांवर पोचली आहे. महिलांच्या नेतृत्वाखाली विकसित होणारे उद्योग क्षेत्र आर्थिक उलाढालीचे केंद्र का ठरत आहे? याचे जर आकलन करायचे असेल तर याचे उत्तर 'वर्ल्ड इकोनॉमिक फोरम'च्या 'अॅडव्हान्सिंग जेंडर पॅरिटी इन आंत्रप्रेन्योरशिप स्ट्रॅटजी फॉर अ मोर इक्वेटेबल फ्यूचर' नावाच्या अहवालात सापडेल. त्यांच्या मते, महिलांच्या नेतृत्वाखाली विकसित होणार्या व्यवसायात विविध दृष्टिकोन अंगीकारला जातो आणि सर्वसमावेशक नेतृत्वाला प्रोत्साहन देखील मिळते.

# खरीप हंगाम पूर्व कार्यशाळा



**रिसोड** : तालुक्यातील खरीप हंगाम पूर्व नियोजन २०२५-२६ चीआढावा बैठक रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार अमित झनक यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर ,कृषि उपसंचालक हीना शेख , फळबाग तज्ञ निवृत्ती पाटील, तालुक्यातील कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी , शेतकरी उत्पादक कंपनी प्रतिनिधि , पत्रकार उपस्थित होते.

या बैठकीत आमदार अमित झनक यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि खरीप हंगामाच्या पूर्वतयारीबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि कीटकनाशके वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच, शेतकऱ्यांना पीक कर्ज आणि पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन केले.

या बैठकीत तालुका कृषि अधिकारी मगनदास तावरे यांनी कृषी विभागाच्या खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आणि हवामानावर आधारित शेती करण्यासह शेतकऱ्या साठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली आणि त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. ता.प्र.

या बैठकीत शेतकरी प्रतिनिधींनी तालुक्यातील सिंचन समस्या, पारंपरिक पीक पद्धती ला पर्यायी पीक ,तसेच महाडीबीटी मधील प्रलंबित अनुदान आणि बाजारपेठेतील समस्या मांडल्या. आमदार झनक यांनी या समस्यांची दखल घेतली आणि त्या सोडवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत तालुक्यातील खरीप हंगामाच्या पूर्वतयारीबाबत सविस्तर चर्चा झाली आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यात आले. तसेच कृषि विभागाने खरीप च्या अनुषंगाने केलेल्या पूर्वतयारी बाबत समाधान व्यक्त केले खरीपपूर्व आढावा बैठकीचे नियोजन तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले होते

## दिशाभूल करणाऱ्या संदेशांपासून सावध राहण्याचे निवृत्तीवेतनधारकांना आवाहन

मुंबई, दि. ९ : संचालनालय, लेखा व कोषागारे तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व सर्व कोषागार कार्यालये यांच्यामार्फत सर्व निवृत्तीवेतनधारकांना सूचित करण्यात येते की, निवृत्तीवेतन सुरू करणे, निवृत्तीवेतन बंद करणे, निवृत्तीवेतन फरक अदा करणे अथवा अतिरिक्त रक्कम वसुल करण्याच्या अनुषंगाने राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोनद्वारे / मोबाईलद्वारे निवृत्तीवेतनधारकांना कळविले जात नाही. तसेच व्हॉट्स अॅपद्वारे अथवा इतर सोशल मिडियावरून निवृत्तीवेतन बंद होऊ नये, याकरिता लिंक ओपन करून फॉर्म भरण्याबाबतही कळविले जात नाही. तसेच कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही. कोषागारामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरिता पत्रव्यवहार केला जातो. सर्व निवृत्तीवेतनधारकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी फोन पे / गूगल पे/ ऑनलाईन रक्कम भरण्याच्या अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये. अशा प्रकारे दूरध्वनीद्वारे / मोबाईलद्वारे संदेश प्राप्त झाल्यास संबंधित कोषागार कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# श्रींच्या पालखीचे २ जून रोजी पंढरपूरसाठी प्रस्थान

## ७०० वारकऱ्यांचा सहभाग : पालखीचे ५६ वे वर्ष

वारकरी पंढरीचा ! धन्य धन्य जन्म त्याचा !!१
जाये नेमें पंढरीसी ! चुको नेदी तो वारीसी !!२
आषाढी कार्तिकी ! सदा नाम गाय मुखी !!३
एका जनार्दनी करी वारी ! धन्य तोचि बा संसारी !!४

**शेगाव** : पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात दरवर्षी श्रींची पालखी सहभागी होते. परंपरे नुसार यदाही श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्रींची पालखी ज्येष्ठ शु.७ म्हणजेच २ जून रोजी सकाळी ७ वाजता प्रस्थान करणार आहे. पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे संस्थानचे हे ५६ वे वर्ष आहे. श्रींच्या पालखीत जवळपास सातशे वारकऱ्यांसह, टाळकरी, वारकरी, पताकाधारी, हरीनामाच्या गजरात जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल नामाचा जप करीत संत नगरीतून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

एकादशीला भूवैकुंठ पंढरपूरच्या विठोबाची महायात्रा आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघी अशा चार एकादशीला पंढरपूरला भरते. जो नित्याने वारंवार पंढरपूरला जातो तो वारकरी होय. श्रीसंत गजानन महाराजांच्या पुनीत वास्तव्याने पावन झालेल्या शेगाव नगरीला विदर्भाचे पंढरपूर म्हणून गौरविल्या जाते. पंढरीनाथाच्या भेटीसाठी प्रत्यक्ष शेगावच्या योगी गजाननाने हजारो वारकऱ्यांसह वारी केल्याचे दाखले मिळतात. त्यामुळे येथील वारीला असलेली परंपरा ही संतांनी दाखविलेल्या मार्गावर गेल्या ५५ वर्षांपासून अव्याहतपणे जपली जात आहे. ज्येष्ठ शुद्ध ७, २ जून रोजी महाराजांची पालखी विठूरायाच्या भेटीला मार्गस्थ होणार आहे. टाळ, मृदंग वाजत,गाजत, शेकडो वारकरी हातात भागवत धर्माची पताका व मुखी हरी नामाचा गजर करीत श्रींच्या पालखीसह पंढरीची वाट धरतात. श्रींच्या दिंडीमध्ये, पताकाधारी, गायक, मृदंगवादक, सेवेकरी अशा एकूण सातशे जणांचा समावेश असतो. या दिंडीमध्ये एक विणेकरी व स्वयंशिस्तीने टाळकरी व पताकाधारी चालत असतात. मजल दरमजल करत ठरलेल्या ठिकाणी मुक्काम, तेथे भजन, कीर्तन, प्रवचन करीत भागवत धर्म वाढवण्याचा प्रयत्न करतात. मार्गावरील अनेक छोट्या-मोठ्या गावांना आनंदात सहभागी होण्याचे भाग्य मिळते. दिवसभर वारी आणि रात्रीचा मुक्काम, मुक्कामाचे दिवस आणि गावे ठरलेली असतात. मुक्कामाच्या ठिकाणी सकाळी काकडा, हरीपाठ, रस्त्याने भजन, श्रींची आरती, प्रवचन आदी कार्यक्रम नित्य नियमाने रोज होतात.





मजल दरमजल करत मुखी संतांचे अभंग गात पाउले श्रद्धेने पंढरीकडे चालत असतात. पाऊस असो वा ऊन, वारा अथवा थंडी असो , चालताना विठ्ठल दर्शनाची ऊर्जा वारकऱ्यांना पुरेशी असते. प्रत्यक्ष श्रीसंत गजानन महाराजांची पालखी सोबत असल्याने जणू सर्व सुखाचे आगर सोबत असल्याची भावना असते. तब्बल ३३ दिवसांचा पायी करून श्रींची पालखी आषाढ शु.९ म्हणजे ४ जुलै रोजी शुक्रवार पंढरपुरी येथे पोहोचणार आहे. पोहोचलेले वारकरी पंढरीच्या भूमीवर पाय ठेवण्यापूर्वी तेथील माती कपाळाला लावून जणू विठ्ठलमय होऊन जातात.

### श्रींच्या पालखीचा पंढरपूर पायदळ प्रवास.

२ जुन रोजी श्री क्षेत्र नागझरी येथील संत गोमाजी महाराज संस्थानमध्ये महाप्रसादानंतर सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. ३ जुन रोजी पारस येथून गायगाव येथे तर रात्री भौरद येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर अकोला येथे ४ व ५ जुन असे दोन दिवस मुक्काम राहील. ६ जुन रोजी सकाळी भरतपूर-वाडेगाव, ७ जुन रोजी देऊळगाव (बाभूळगाव)-पातूर, ८ जुन मेडशी-श्री क्षेत्र डव्हा, ९ जुन मालेगाव- शिरपूर जैन, १० जुन चिचापा पेन-म्हसला पेन, ११ जुन किनखेडा-रिसोड, १२ जून पानकन्हेरगाव-सेनगाव, १३ जुन श्री क्षेत्र नरसी(नामदेव) - हिंग्रस, १४ जून श्री क्षेत्र औंढा नागनाथ-जवळा बाजार, १५ जुन हट्टा(अडगांव रंजोबा) श्री क्षेत्र त्रिधारा, १६ जुन परभणी- परभणी, १७ जून ब्राह्मणगाव दैठणा, १८ जुन खळी - गंगाखेड, १९ जुन वडगाव (दादा हरी) परळी (थर्मल), २० जुन परळी- परळी वैजनाथ, २१ जुन कन्हेरवाडी- अंबाजोगाई, २२ जुन लोखंडी सावरगाव - बोरी/सावरगाव, २३ जुन गोटेगाव - कळंब, २४ जुन गोविंदपूर - तेरणा सा. कारखाना, २५ जुन किनी - उपळा (माकडाचे), २६ जुन श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर (धाराशिव) धाराशिव, २७ जुन वडगाव सिद्धेश्वर-श्री क्षेत्र तुळजापूर, २८ जुन सांगवी, ऊळे, २९ जुन सोलापूर, सोलापूर, ३० जुलै सोलापूर - सोलापूर, १ जुलै सोलापूर, तिऱ्हे, २ जुलै कामती खु. (वाघोली) माचनूर, ३ जुलै ब्रह्मपुरी, श्री क्षेत्र मंगळवेढा, ४ जुलै श्री क्षेत्र मंगळवेढा व रात्री श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींची पालखी पोहचणार आहे. तर ४ जुलै ते ९ जुलै पर्यंत श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. १० जुलै २०२५ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथुन श्रींच्या पालखी सोहळा निघून ३१ जुलै २०२५ वार गुरुवार रोजी संतनगरी शेगांव येथे दाखल होणार आहे.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. अॅक्ट नुसार संपादक जबाबदार)

# जलतारा उपक्रमामध्ये रिसोड तालुका अग्रेसर

**समता फाउंडेशनचा सहभाग**



**रिसोड :** जिल्हाधिकारी वाशिम यांचा जलसंधारणाचा महत्वकांशी उपक्रम जलतारा मध्ये समता फाउंडेशनच्या सक्रिय सहभागाने रिसोड तालुका सध्या आगे कूच करीत आहे.

शेती पाणीदार करण्यासाठी पाण्याची उपलब्धता करणे अत्यावश्यक आहे. शेती समृध्द करूनच आपल्या जिल्ह्याचा विकास होवू शकतो, त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी जलतारा प्रकल्प योजना १ मार्च पासून शेतात राबविण्याची सुरूवात केली. जिल्हाधिकाऱ्यांनी जलतारा योजनेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्याला सकारात्मक प्रतिसाद देत समता फाउंडेशन ने रिसोड तालुक्यातील काही गावांमध्ये शेतकऱ्यांना मोफत जलतारा प्रकल्पातील गड्डे खोदून देण्याची जबाबदारी घेतली.

त्या अंतर्गत तालुक्यातील मांडवा, कुऱ्हा, घोटा, वाकद, मोप, मोठेगाव, अगरवाडी अशा विविध ठिकाणी शेतकऱ्यांना मोफत गड्डे खोदून देत आहे. ८ मार्च पर्यंत अधिकृत आकडेवारीनुसार रिसोड तालुक्यात एकूण १२१० गड्डे खोदण्यात आली होती त्यापैकी ६२० गड्डे समता फाउंडेशन ने खोदून दिले हे विशेष.

वाशिम जिल्ह्यामध्ये कारंजा १४६३, वाशीम १५६८, रिसोड १२१०, मानोरा ४२७ व मालेगाव ६९७ जलताराचे गड्डे खोदण्यात आलेले आहेत. समता फाउंडेशन चा जलतारा प्रकल्पामध्ये असलेल्या सक्रिय सहभाग पाहता रिसोड तालुका जिल्ह्यामध्ये लवकरच पहिल्या क्रमांकावरील येईल असे दिसते. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी माननीय जिल्हाधिकारी यांच्या महत्त्वकांक्षी जलतारा प्रकल्पामध्ये सहभागी होऊन समता फाउंडेशन तर्फे आपल्या शेतामध्ये जालतारा चे मोफत गड्डे खोदून घ्यावेत असे आवाहन समता फाउंडेशन च्या वतीने करण्यात आले आहे. श.प्र.

# खासगी व थेट बाजारांची होणार तपासणी

- शेतमाल विक्री सुविधासंदर्भात तक्रारी
- पायाभूत सुविधा आणि व्यवहारांची चौकशी करण्याचे पणनमंत्र्यांचे आदेश



> राज्यात मोठ्या क्षेत्रावर फळे आणि भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते. राज्यात ४६६ फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था नोंदणीकृत असून त्यापैकी ४५३ संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून उत्पादित फळे आणि भाजीपाला पिकांची साठवणूक करणे ग्रेडिंग पॅकिंग व निर्यात करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पणन संचालयाने नियोजन करावे. महामँगो, महाग्रेप्स, महाबनाना, महाऑरेंज, महाआनार, अशा संस्थांना त्यांच्या संबंधित कृषी मालाला निर्यात करण्याचे संदर्भात चालना देण्यात यावी असे मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

**पुणे :** राज्यात शेतकऱ्यांना शेतमाल विक्री साठी कृषी उत्पन्न बाजार समिती व्यतिरिक्त १०५ खाजगी बाजार तसेच थेट बाजार कार्यरत आहेत. काही खाजगी व थेट बाजारा बाबत शेतमाल विक्री सुविधा संदर्भात तक्रारी आहेत. खाजगी बाजारात खरेदी विक्री शेड, बाजार ओटे, गोडावुन, रस्ते या सह पायाभूत सुविधांची तपासणी करण्यात यावी. तसेच त्यांचे खरेदी विक्रीचे सर्व व्यवहार ऑनलाईन करण्या संदर्भात सूचना देण्यात याव्या. परवाना देताना लावून दिलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या खाजगी व थेट बाजार यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. व्यवहार पारदर्शक नसलेल्याचे परवाने रद्द करण्याची करण्यात यावी. तसेच सर्व खाजगी व थेट बाजाराचे लेखा परीक्षण करण्यात यावे असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. ते पणन संचालनायाच्या बैठकीत बोलत होते.

पणन संचालनायाची पुण्यात बैठक झाली. या बैठकीत पणन संचालक विकास रसाळ, उपसंचालक मोहन निंबाळकर, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे या सह अधिकारी उपस्थित होते. रावल म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समिती सह खाजगी व थेट बाजारात शेतकऱ्यांनी विकलेला मालाचे पैसे शेतकऱ्यांना २४ तासाच्या आत ऑनलाइन पद्धतीने किंवा इतर मान्य पद्धतीने देण्यात यावे. प्रत्येक महिन्यात शेतकऱ्यांच्या मालाचे पैसे शेतकऱ्यांना दिले का? यासंदर्भात आढावा घेण्यात यावा. शेतमाल विक्रीचे पैसे अडवून ठेवलेल्या परवानाधारकांवर परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

- 'लाडकी बहीण योजने'च्या नावाखाली घोटाळा
- गुजरात कनेक्शन; काही जण पोलीसांच्या ताब्यात

# लाडक्या बहिणींनो सावधान!

**मुंबई:** राज्य सरकारकडून महिलांसाठी खास लाडकी बहीण योजना ही राबवली जातंय. या योजनेतून महिलांना दरमहा १५०० रूपये सरकारकडून दिली जात आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही नियम व अटी देखील लागू करण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीमध्ये लाडकी बहीण योजनेचा सरकारला मोठा फायदा झाला. मात्र, आता लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली मोठा घोटाळा सुरु असल्याची धक्कादायक माहिती पुढे आलीये. पोलिसांनी काही जणांना ताब्यात देखील घेतले आहे. जुहू पोलिसांनी एका मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. झोपडपट्टीतील लोकांना 'लाडकी बहीण योजना'चे आमिष दाखवून त्यांचे बँक खाते उघडले जात होते. पोलिसांनी या प्रकरणी तीन जणांना अटक केली आहे. हे लोक हे बँक खाते सायबर गुन्हेगारांना आणि मनी लाँडरिंग करणाऱ्यांना विकत होते. अशा प्रकारे त्यांनी तब्बल २५०० पेक्षा जास्त बँक खाती उघडली होती. हैराण करणारे म्हणजे आरोपी गुजरातच्या सुरत शहरातून हे रॅकेट चालवत होते. या आरोपींनी मुंबईतील नेहरू नगर, डी. एन. नगर आणि धारावी यांसारख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना टार्गेट केले. त्यांनी फार शिक्षण नसलेल्या लोकांना लाडकी बहीण योजनेचे अमिष दाखवले आणि दर महिन्याला १५०० रूपये तुम्हाला भेटणार असल्याचे देखील सांगितले.

## केंद्राच्या पीएम-यशस्वी शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना लागू करण्याचा निर्णय

मुंबई - प्रधानमंत्री यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲवार्ड स्किम फॉर व्हायब्रंट इंडिया (PM²- YASASVI ) या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या योजनेंतर्गत ओबीसी आणि डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिक पूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र सरकारने २०२१-२२ ते २०२५-२६ वर्षांकरिता जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत.

# दुधाळ जनावर खरेदीस जिल्हास्तरावरच परवानगी द्यावी

वाशिम : पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यात अल्पभूधारक शेतकरी, बेरोजगार युवक आणि महिलांसाठी आर्थिक स्वावलंबनाच्या उद्देशाने नाविन्यपूर्ण दुधाळ जनावर वाटप योजना राबविली जात आहे. मात्र, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे खरेदीसाठी इतर जिल्ह्यांमध्ये जावे लागत असल्याने अतिरिक्त खर्च व अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर योजनेत लाभ मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना जनावरे खरेदीसाठी सात ते आठ हजार रुपयांपर्यंत वाहतूक खर्च होतो. शिवाय, इच्छित जनावर न मिळाल्यास दुसऱ्या जिल्ह्यात पुन्हा जावे लागते, यामुळे वेळ आणि पैशांची दोन्ही हानी होते. या पार्श्वभूमीवर, भगवान कैलास ढोले, संपादक साप्ताहिक सम्यक दूत, तोंडगाव (ता. वाशिम) यांनी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांना निवेदन देऊन, दुधाळ जनावरे खरेदीसाठी लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यांतच खरेदीची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचा अनावश्यक खर्च वाचेल आणि त्या रकमेचा उपयोग करून ते अधिक दर्जेदार व मनपसंद जनावरे खरेदी करू शकतील. यामुळे योजनेंतर्गत लाभ अधिक प्रभावीपणे शेतकरी व गरजू घटकांपर्यंत पोहोचेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# नगर परिषद कार्यालय, वाशिम

## निविदा सूचना २०२५-२६ क्र. 05 (Open Tender)

मुख्याधिकारी नगर परिषद, वाशिम खालील कामांची ई-निविदा टक्केवारी दराने दोन लिफाफा पध्दतीने मागवित आहेत. कामाच्या निविदा केवळ ई- निविदा पध्दतीने (Online) सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या विस्तृत नमुना व निविदा बाबत अटी - शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या असून त्याबाबतचे Tender ID पुढील प्रमाणे आहेत.

१) **2025_DMA_1178622_1**

वरील संकेतस्थळावर पहावयास उपलब्ध आहेत. प्रसिध्द करणेत आलेल्या वेळापत्रका नूसार व ई-निविदा प्रपत्रातील अटी शर्ती नूसार निविदाकारांनी कार्यवाही करावी.

स्वाक्षरीत/-

**(निलेश गायकवाड)**
मुख्याधिकारी
नगर परिषद, वाशिम

जा.क्र.नपवा/कार्या-१७/६२८/२०२५
दि. ९/५/२०२५

## जागतिक थॅलसेमिया दिन उत्साहात



रिसोड: जागतिक थॅलसेमिया दिनानिमित्त वाशीम जिल्ह्यात विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्याला नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला. या उपक्रमातून थॅलसेमिया विषयी जनजागृती वाढवण्यास आणि नागरिकांना वैद्यकीय लाभ मिळवून देण्यास मदत झाली.

या कार्यक्रमाचा ग्रामीण रुग्णालय रिसोड येथून करण्यात आलाङ. त्यानंतर तालुक्यात विविध ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये बी.पी., शुगर, वजन, रक्ताची चाचणी आदी तपासण्या करण्यात आल्या. याचा लाभ अनेक नागरिकांनी घेतला. कार्यक्रमाला मान्यवर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले सर, वैद्यकीय अधिक्षक डॉ.पवार सर, डॉ वाशिमकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ सर, आरोग्य कर्मचारी, कार्यक्रम समन्वयक पुरुषोत्तम इंगोले, तालुका सिकलसेल सहाय्यक श्री.भारत पारवे यांचा सहभाग होता कार्यक्रमात थॅलसेमिया रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती लक्षणीय होती. विविध वैद्यकीय तपासण्या, सल्ला शिबिरे, रक्तदानाचे महत्त्व यावर मार्गदर्शन आणि थॅलसेमिया प्रतिबंधक उपायांवर चर्चा करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून थॅलसेमिया विषयी जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त प्रयत्नांतून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याचे समाधान व्यक्त करण्यातआले. श.प्र.

## चारा आणि पाण्यासाठी जनावरांची भटकंती



**रिसोड** : सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असून तापमानात प्रचंड वाढ होत आहे त्यातच जंगलातील चारा कधीचाच संपलेला असून सोबत नदी नाले पाणवठे कोरडे झाले आहे शेतीचाही हंगाम संपलेला आहे.

त्यामुळे जनावरांना चारा व पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे पूर्वी पाळीव जनावरांची काळजी घेतली जायची शेतकरी ज्वारी चे पीक घ्यायचे त्यातून कडबा कुटार असा जनावरांचा चारा मुबलक उपलब्ध व्हायचा परंतु आता शेतीचे अर्थशास्त्र बदललेले आहे त्यामुळे ज्वारी पिक कमी प्रमाणात घेतले जात असल्यामुळे आज चाऱ्याची टंचाई निर्माण झालेली आहे त्यामुळे जनावरांना पोट भरण्यासाठी चाऱ्याचा शोध घेत जनावरे भटकंती करीत आहे त्यातच परिसरातील नाले शुष्क झालेली आहे त्यामुळे जनावरांना पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झालेला आहे चारा आणि पाणी जर जनावरांना योग्य प्रमाणात मिळत नसल्याने अनेक जनावरे अर्धपोटी दिवस काढत आहे तर अनेक जनावरे कुपोषित दिसत आहेत पुरेसा चारा आणि मुबलक पाणी नसल्याने जनावरांची वाढ खुंटत आहे. शेवटी हे जनावरे भाकड झाली तर त्याची रवानगी कत्तल खानाकडे होताना दिसत आहे. त्यामुळे जनावरांसाठी चाऱ्याच्या छावण्या व चारा वितरण व पाण्याच्या सुविधा होणे क्रमप्राप्त आहे. (श.प्र.)

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, वाशिम जिल्हा कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन

वाशिम,दि.७ मे (जिमाका) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय वाशिम येथे नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे तातडीने निवारण व्हावे यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत जिल्हा व्यवस्थापक नागरिकांना भेटण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. यावेळी नागरिकांना आपल्या प्रलंबित कामांबाबत तक्रारी मांडता येणार असून, संबंधित तक्रारी विहित नमुन्यातील अर्जासह सादर कराव्या लागतील. नागरिकांनी आपल्या तक्रारीसह जिल्हा कार्यालय, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नालंदा नगर, चिखली रोड, वाशिम येथील जिल्हा कार्यालयात दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक मिलिंद धांडे यांनी केले आहे.

# रिसोडच्या पाणी टंचाईसाठी ७५ कोटींच्या योजनेला मंजूरी

### माजी खा. अनंतराव देशमुख यांची माहीती

रिसोड : गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याच्या तीव्र टंचाईचा सामना करणाऱ्या रिसोड शहरासाठी दिलासादायक बातमी आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत ७५ कोटी रुपयांची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून, लवकरच या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार आहे.

शहराची वाढती लोकसंख्या आणि जीर्ण झालेली जुनी पाणी योजना लक्षात घेता, पाणीटंचाईचा कायमस्वरूपी उपाय म्हणून नव्या योजनेची गरज होती. माजी खासदार



अनंतराव देशमुख यांनी १३ एप्रिल २०२३ रोजी भाजपच्या महासंकल्प सभेदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी मांडली होती. त्यावेळी फडणीस यांनी तात्काळ ही मागणी मंजूर केली, असे सभेमध्ये सांगितले होते. त्यानंतर माजी खासदार देशमुख यांनी ही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने ही पाणीपुरवठा योजना आता पूर्णत्वास आली आहे. येत्या काही दिवसांत या पाणीपुरवठा योजनेचे काम मार्गी लागणार असल्याचे माजी खासदार देशमुख यांनी सांगितले. या ७५ कोटी रुपयांच्या निधीची योजनेमुळे रिसोडकरांचा पाणीटंचाईचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. सध्या रिसोड शहरात पाचते सहा दिवसाआड पाणी येत असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी मोठा अडचणीचा सामना करावा लागत आहे. (वि. प्र.)

# राज्यात सरासरी 50 हजारांवर अनधिकृत स्कूलबसेस

### ३ महिन्यात नियमित करून घेण्याची 'परिवहन'ची तंबी

**वर्धा**: राज्यात सुमारे ५० हजारांवर अनधिकृत स्कूलबसेस असून येत्या ३ महिन्यात त्यांना नियमित करून घ्यावे, अशी तंबी परिवहननेच दिला आहे. दरम्यान राज्याने स्कूल बस धोरण तयार केले असून असे धोरण करणारे महाराष्ट्र राज्य पहिले राज्य ठरले आहे. स्कूल बसेसने विद्यार्थ्यांना आगामी शाळासत्रात ने आण केली जाणार असताना नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी सूचना करण्यात आली.

राज्यातील स्कूलबस असोसिएशन, पालक असोसिएशनचे प्रतिनिधी तसेच परिवहनच्या अधिकाऱ्यांची बैठक यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. परिवहनचे विविध अधिकारीही बैठकीला उपस्थित होते. शासकीय माहितीत राज्यात सध्या ४० हजार स्कूलबस सेवा देत आहेत. पण याशिवाय ५० हजारांच्या आसपास अनधिकृत स्कूलबसेस विद्यार्थ्यांची ने - आण करतात. बैठकीत स्कूल बसेसच्या चालक मालक संघटनेच्या प्रतिनिधींनीही तसेच पदाधिकाऱ्यांनी तक्रारी केल्यात.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला परिवहन विभाग सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचे परिवहन मंत्र्यांनी सांगितले. स्कूल बसमधून



विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित तसेच सुखावह झाला पाहिजे, असे परिवहन मंत्र्यांनी म्हटले.

याकरीता नियमावलीत योग्य ती सुधारणा केली जाईल, असे परिवहन मंत्र्यांनी आश्वस्त केले. स्कूल बसमधूनही बसचालकांनी विद्यार्थ्यांना ने- आण करताना नियमांचे काटेकोर पालन करावे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसोबत कोठलीही तडजोड करू नये, परिवहन विभागही कोठलीही तडजोड करणार नाही, नियमांबाबत सुधारणा करताना वाहनचालक तसेच पालक संघटनांच्या भावनांचा विचार केला जाईल, नियमांचे पालन केवळ कायद्याच्या भितीपोटी नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या भावनेतून केले जावे, असे परिवहन मंत्र्यांनी स्पष्ट केले. स्कूलबस धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे परिवहन आयुक्तांनी सांगितले. या धोरणातील सर्व त्रुटी दूर करण्याबाबत बैठकीत आश्वस्त केले गेले.

जोडीलाच बैठकीत पालक संघटना तसेच स्कूल बस असोसिएशनने मांडलेल्या सूचनांचाही स्कूलबस धोरण ठरविताना विचार केला जाईल, असे आश्वासन दिले गेले.

# श्री बालाजी सहकारी सुतगिरीच्या अध्यक्षपदी बाबाराव खडसे

### यांची अविरोध करण्यात आली निवड

रिसोड: श्री बालाजी सहकारी सूतगिरणी मर्यादित रिसोड ची निवडणूक दिनांक २४ मार्च २०२५ ला होऊन यामध्ये सर्व १६ संचालकाची अविरोध निवड करण्यात आली यानंतर ६ मे २०२५ ला श्री बालाजी सहकारी सूतगिरणीच्या कार्यालयात नवीन संचालकाची सभा संपन्न होऊन यामध्ये बाबाराव खडसे पाटील यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करून सूतगिरणीची



धुरा त्यांच्याकडे परत सोपविण्यात आली.

विशेष म्हणजे सूतगिरणीच्या स्थापनेपासून अविरोध निवडणूक होत आहे सूतगिरणीचे या पहिल्या सभेसाठी आर आर सावंत निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंध प्रशासन उपजिल्हा निबंधक कार्यालय वाशिम व बी बी मोरे सहाय्यक निवडणूक अधिकारी उपस्थित होते बालाजी सहकारी सूतगिरणी मर्यादित रिसोडच्या संचालकामध्ये विजय तेजराव उगले कैलास श्रीराम खांनझोडे, देविदास किसन सदार, राहुल रामदास पवार, पुरुषोत्तम नारायण पुंड, संदीप वामनराव पाचरणे, संजय वल्लभदास शर्मा, नारायणराव वामनराव सानप, अमित बाबाराव पाटील, भाऊराव साहेबराव खडसे, किशोर यशवंत पोधे सौ राणी रवींद्र नरवाडे, सौ वंदनाताई सुधाकर भुतेकर, पांडुरंग लक्ष्मण कोकाटे, सिताराम लक्ष्मण बोबडे यांची अविरोध निवड झाली यावेळी रवींद्र शंकर नरवाडे सुधाकर रामभाऊ भुतेकर यांची उपस्थिती होती. वि.प्र.

# शेतकरी अर्ज पोर्टलवरील कामकाज गतीमान व्हावे

वाशिम : महाडीबीटी शेतकरी अर्ज पोर्टलवरील संथ प्रक्रियेचा फटका राज्यातील शेतकऱ्यांना बसत असून, शेतकरी वेळेवर अर्ज करूनही लाभापासून वंचित राहत आहेत. या पार्श्वभूमीवर भगवान ढोले यांनी मा. ॲड. निलेश हेलोंडे पाटील (अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, राज्य मंत्री दर्जा) यांच्याकडे निवेदनाद्वारे अर्ज प्रक्रियेतील गती वाढविण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांना बीज, बियाणे, यंत्रसामग्री यांसारख्या शेतीसाठी अत्यावश्यक गोष्टींवर अनुदान मिळावे यासाठी शासनाने महाडीबीटी पोर्टल सुरू केले आहे. मात्र, शेतकऱ्यांनी अर्ज सादर केल्यानंतर महिन्यांनंतरही कार्यवाही न झाल्याने, पिकपेरणीच्या काळातही शेतकरी लाभांपासून दूर राहतो आहे. या संदर्भात भगवान ढोले यांनी शेतकऱ्यांना विहित मुदतीत लाभ मिळावा, यासाठी अर्ज प्रक्रियेला गती देणे गरजेचे असल्याचे नमूद करत, संबंधित यंत्रणांनी तत्काळ लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे.